जा.क्र.मुदवसुअ/प्रा/परिपत्रक/ 1527 /२०२४
मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/ प्राधिकरण, मुंबई
दि. 12/07/2024

## दक्षता विभागाचे परिपत्रक -१२

विषय- इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र जारी झालेले नसताना इमारतीमध्ये अधिवास असल्यास अशा इमारतींमध्ये फलक बसविणेबाबत.

म्हाडाच्या अखत्यारितील विभागीय गृहनिर्माण मंडळांअंतर्गत बांधण्यात आलेल्या इमारतींच्या पुर्नविकासासाठी विभागीय गृहनिर्माण मंडळांमार्फत ना हरकत प्रमाणपत्र जारी केले जाते. तसेच मुंबई शहरातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुर्नविकासासाठी मुंबई इमारत दुरुस्ती व पुर्नरचना मंडळ मार्फत ना हरकत प्रमाणपत्र जारी केले जाते.

पुर्नविकसित इमारतीला नियोजन प्राधिकरणा कडून भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतरच रहिवाशांना विकासकाने सदनिकेचा ताबा देणे आवश्यक आहे. तथापि पुर्नविकसित इमारतीला भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त नसताना विकासकाने सदनिकांचा ताबा दिल्याबाबतच्या तक्रारी या कार्यालयास प्राप्त होत असतात. ही अतिशय गंभीर व धोकादायक बाब आहे.

यास्तव परिपत्रकाद्वारे असे सुचित करण्यात येते कि, इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र नसताना इमारतीमध्ये अधिवास आढळल्यास अशा इमारतींच्या विकासकास कारणे दाखवा नोटिस जारी करावी. तसेच "सदर इमारतीस नियोजन प्राधिकरणाने भोगवटा प्रमाणपत्र जारी केलेले नाही" असा फलक इमारतीच्या दर्शनी भागामध्ये बसविण्यात यावा.

सदर परिपत्रकाचे काटेकोरपणे पालन करावे.

(विनीत अग्रवाल)
अपर पोलीस महासंचालक तथा
मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/प्रा.

प्रति,

मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.

मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ

निवासी कार्यकारी अभियंता मुंबई मंडळ/ मुंबई इमारत दुरुस्ती पुर्नरचना मंडळ.

कार्यकारी अभियंता - बोरिवली / गोरेगाव / बांद्रा / शहर / कुर्ला विभाग मुंबई मंडळ.

मुख्य अधिकारी, कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.

मुख्य अधिकारी, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ मंडळ.

मुख्य अधिकारी, पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.

मुख्य अधिकारी, नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.

मुख्य अधिकारी, अमरावती गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.

मुख्य अधिकारी, छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.

मुख्य अधिकारी, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.

प्रत उपाध्यक्ष/ प्राधिकरण यांना माहितीसाठी.